मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चऱ्होली परिसरात महापालिकेने टँकरने मोफत पाणीपुरवठा करावा : अजित गव्हाणे

## भर पावसात वडमुखवाडी, चऱ्होलीतील पाणी टंचाई विरोधात नागरिकांचा हंडा मोर्चा : आगामी काळात पाणी प्रश्नावर उग्र आंदोलन छेडण्याचा गव्हाणे यांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

वडमुखवाडी, चऱ्होलीतील पाणी प्रश्नावर नागरिक आक्रमक झाल्याचे आज (दि.२६) पाहायला मिळाले. स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली हंडा मोर्चा काढून नागरिकांनी आपला संताप व्यक्त केला. "नागरिकांच्या संयमाचा बांध आता फुटला असून धरण भरलेले असताना नागरिकांना चार ते पाच दिवस पाणी मिळत नाही ही मोठी शोकांतिका आहे.

गेल्या दहा वर्षातील नियोजनशून्य आणि भ्रष्टाचारी कारभारामुळे "पाणीबाणी"ची परिस्थिती उद्भवली असल्याची घणाघाती टीका अजित गव्हाणे यांनी केली. येथील पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत चऱ्होली परिसरात महापालिकेने टँकरने मोफत पाणीपुरवठा करावा अशी आग्रही मागणी गव्हाणे यांनी केली आहे.

स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि 26) नागरिकांनी हंडा मोर्चा काढून या भागात ओढवलेल्या पाणी संकटाकडे लक्ष वेधले. यावेळी साई नगर, माऊली नगर, लक्ष्मी नारायण नगर, मोरया नगर, तापकीर नगर, ताजने मळा, बुर्डे वस्ती या भागातील नागरिकांनी हंडा मोर्चामध्ये सहभाग घेतला. महिला बहुसंख्येने यावेळी उपस्थित होत्या. माजी नगरसेवक विनया तापकीर, अनुज प्रदीपआबा तापकीर, अनिल तापकीर, कुणाल तापकीर, दत्ताभाऊ बुर्डे, गणेश तापकीर, सागर तापकीर, अनिल सुदाम तापकीर, तुकाराम तापकीर, शुभम तापकीर, चेतन तापकीर, माऊली तापकीर, ऋषिकेश तापकीर, मीरा काळजे, माधुरी भोसले, अनिता देवकर आदीं यावेळी उपस्थित होत्या.



### चऱ्होलीत पाण्याची चोरी..

» चऱ्होलीत पालिकेच्या पाण्याच्या टाकीवरून पाण्याची चोरी होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पाण्याची चोरी होत असल्याचा आमच्याकडे पुरावा असल्याचेही नागरिक यावेळी म्हणाले. पालिका प्रशासनाने याची चौकशी करावी. नागरिकांना वाटेल तसे बोलून अपमान करणारा अधिकारी यात सामील असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

### उग्र आंदोलन करू..

» हंडा मोर्चा काढून प्रशासनाला जागे केले आहे. येथील पाण्याचा प्रश्न तातडीने सुटला नाही तर आगामी काळात उग्र आंदोलन करू असा इशारा माजी नगरसेविका विनया तापकीर यांनी दिला.

अजित गव्हाणे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरातील सर्वात वेगाने विकसित झालेला भाग तसेच पिंपरी चिंचवड आणि पुण्याला दुवा साधणारा मध्यवर्ती बिंदू असल्यामुळे चऱ्होली, वडमुखवाडी आणि डुडुळगाव या भागामध्ये प्रचंड लोकवस्ती वाढली आहे. मोठे गृहप्रकल्प झाले आहेत. त्यामुळे हा भाग रेसिडेन्शिअल हब म्हणून ओळखला जात आहे. मात्र या भागाला पाण्यासाठी ओरड करावी लागते ही मोठी शोकांतिका आहे.

येथील अनेक सोसायट्यांमध्ये चार ते पाच दिवस पाणी येत नाही. टँकरने पाणी घ्यावे लागते. वारंवार नागरिक, सोसायटी धारक तक्रारी करत असूनही कोणी लक्ष देत नाही. पाण्याच्या तक्रारी करणाऱ्या नागरिकांना अधिकारी दुरुस्तर करतात. वाटेल तसे बोलतात. त्यामुळे नागरिक तसेच सोसायटीधारकांचा संयमाचा बांध फुटला आहे. अनेकांनी माझ्याकडे तक्रारी केल्यामुळे हा हंडा मोर्चा काढून भाजप आमदारांच्या भ्रष्ट कारभाराचा निषेध व्यक्त केला आहे.

# व्यापारी संकुलातील गाळे व भाजी मंडई ओट्याची आरक्षण सोडत

## विविध ठिकाणी दिव्यांग व्यक्ती, महिला आणि अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती खुल्या गटातील व्यक्तींना आरक्षण देण्यात येणार असून उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने महापालिका हद्दीतील व्यापारी संकुल गाळे किंवा भाजी मंडईतील ओटे आरक्षित आणि निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील आकुर्डी, रेल्वे स्टेशन, चिखली, रावेत, दापोडी या विविध ठिकाणी दिव्यांग व्यक्ती, महिला आणि अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती खुल्या गटातील व्यक्तींना आरक्षण देण्यात येणार असून उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी आहेत. हे गाळे आरक्षित करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असून याबाबत लवकरच निविदा प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली.



व्यापारी संकुलातील गाळे आणि भाजी मंडई ओटे हे आरक्षित ठेवण्यात 29 जुलै 2024 ते 23 ऑगस्ट 2024 रोजी झालेल्या गाळे वाटप सोडतीत व्यापारी संकुलातील गाळे आणि भाजी मंडई ओटे हे आरक्षित ठेवण्यात आले असून दिव्यांग व्यक्तींना 5 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तसेच अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना 5 टक्के आरक्षण तर महिलांसाठी 30 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तसेच खुल्या गटातील व्यक्तींना उर्वरित गाळेवाटप करण्यात येणार आहे. या गाळेवाटप सोडतीच्या वेळी भूमी आणि जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट, मुख्यलेखापरीक्षण विभागाचे लेखाधिकारी राजन वडके, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच भूमी आणि जिंदगी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मौजे आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळील जागेत खाद्य पदार्थ केंद्र उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी एकूण 49 गाळे उपलब्ध असून दिव्यांग व्यक्तींना 2 गाळे अनुसूचित जाती,जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना 2 गाळे, महिलांसाठी 15 गाळे याठिकाणी उपलब्ध करण्यात आले असून खुल्या गटासाठी 30 गाळे उपलब्ध आहे. मौजे चिखली सेक्टर नंबर 17 आणि 19 घरकुल या ठिकाणी नवीन विकसित झालेल्या भाजी मंडई ओटे येथे एकूण 42 गाळे उपलब्ध करण्यात आले आहे. त्यानुसार दिव्यांग व्यक्तींना 2, अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना 2, महिलांसाठी 13 गाळे तर खुल्या गटासाठी 25 गाळे उपलब्ध आहेत. मौजे चिखली सेक्टर नंबर 17 आणि 19 घरकुल या ठिकाणी नव्याने विकसित करण्यात आलेल्या इमारतीतील व्यापारी गाळे याठिकाणी 11 गाळे उपलब्ध असून दिव्यांग व्यक्तीसाठी 1, अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना 1, महिलांसाठी 3 आणि खुल्या गटासाठी 6 गाळे उपलब्ध आहेत.

# पूरग्रस्तांना मदतीच्या धनादेशाचे वाटप; शहरातील 7 हजार कुटुंबांना मिळणार मदत

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह येथे पूरग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह येथे पूरग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीच्या धनादेशाचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले.



अनुदानाची रक्कम सर्व कुटुंबांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सात हजार पेक्षा अधिक कुटुंबांना ही मदत मिळणार आहे. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे, यशवंत माने, तहसिलदार किरण सुरवसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

नागरिकांनी पूर परिस्थितीत अधिक दक्षता घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे. खडकवासला धरणातून विसर्ग सोडल्यावर नदीपात्रात प्रवाहाला अडथळा येणार नाही यासाठी महानगरपालिकेने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना श्री. पवार यांनी यावेळी दिल्या. जुलै 2024 मध्ये अतिवृष्टी व वादळवाऱ्यांमुळे जिल्ह्यात अनेक नागरिकांचे नुकसान झाले होते.

ज्या घरात पाणी शिरले अशा कुटुंबांना प्रशासनातर्फे मदतीचे वाटप सुरू करण्यात आले आहे. शासनाने विशेष बाब म्हणून प्रती कुटुंब 5 हजारऐवजी 10 हजार रुपये अनुदान देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार पुणे शहरातील 7 हजार 977 कुटुंबांना 7 कोटी 97 लाख 70 हजार, हवेली तालुक्यातील 682 कुटुंबांना 68 लाख 20 हजार, पिंपरी चिंचवड शहरातील 7 हजार 519 कुटुंबांना 7 कोटी 51 लाख 90 हजार आणि मुळशी तालुक्यातील 90 कुटुंबांना 9 लाख रुपये अनुदान देण्यात येत आहे.

याशिवाय विजेचा झटका लागून मयत झालेल्या दोन व्यक्तींच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी 10 लाख, तर मुळशी तालुक्यातील आदरवाडी येथे दरड कोसळून मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना ४ लाखाचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. अनुदानाची रक्कम सर्व कुटुंबांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सात हजार पेक्षा अधिक कुटुंबांना ही मदत मिळणार आहेशासकीय विश्रामगृह येथे पूरग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीच्या धनादेशाचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. .

# शहरात अनेक ठिकाणी नाले,ओढ्यावर बांधकाम अतिक्रमण

## आयुक्तांच्या निर्णयामुळे ओढे व नाल्यावर बांधकामे करणाऱ्यांची धाकधूक वाढणार...

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मुसळधार पाऊस झाल्यानंतर अनेक रस्त्यांवर आणि सखल भागात पाणी साठून पुरसदृश परस्थिती निर्माण होत आहे. महापालिका हद्दीतील नैसर्गिक ओढे, नाल्यांवर नागरिकांनी अतिक्रमण केले आहे. काही बिल्डरांनी नाले बुजवून कमी व्यासाचे पाइप टाकलेले आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साचून राहत आहे. कमी वेळेत सर्वाधिक पाऊस झाल्याने पूरसदृश स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे महापालिकेने आठ क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत प्रत्येकी एक ओढा व नाल्याचे अतिक्रमण व बांधकामे काढण्यात येणार आहे.



त्यामुळे ओढे व नाल्यावर बांधकामे करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत. शहरात लोकसंख्यावाढ होऊ लागल्याने अनेक भागांत पुनर्विकास होत आहे. अनेक गावांतील चाळी, बैठी घरे, झोपडपट्टी, बंगले तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. परंतु त्या भागातील ड्रेनेजलाइन व स्ट्रॉर्म वॉटर जुनी व कमी क्षमतेच्या असल्याने सांडपाणी तिपटीने वाढल्याने ड्रेनेजलाइन वारंवार तुंबण्याचे प्रकार होत आहेत. काही भागांत जुन्याच ड्रेनेजलाइन आहेत. शहरात अनधिकृत बांधकामे, पत्राशेड आणि नवीन गृहप्रकल्प होत आहेत. ही बांधकामे, पत्राशेड होताना नैसर्गिक नाले, ओढे, ड्रेनेजलाइन गायब झाले आहेत.

> ड्रेनेजलाइन व नाल्यांचे सर्वेक्षण खासगी एजन्सीकडून केले आहे. शहराचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्याचा अहवाल तयार केले आहे. त्यामुळे नैसर्गिक नाले,ओढ्यावरील अतिक्रमण व बांधकामे लवकरच काढण्यात येणार आहेत.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता २, महापालिक.

महापालिका हद्दीत नैसर्गिक नाले, ओढे हे बिल्डर व्यावसायिकांनी स्थापत्य विभागाकडून ना-हरकत दाखले घेऊन बुजविले आहेत. त्या पाइपची साफसफाई होत नाही. नाले, ओढे बुजविताना भूमिगत पाइप टाकण्यात आलेले असून, ते पाइप कमी व्यासाचे आहेत. अचानक पाऊस जास्त झाला. पाण्याचा योग्य निचरा न होता सखल भागात पाणी साचने, ड्रेनेज तुंबण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. अतिक्रमणांमुळे देखील अनेक भागांत नाले तुंबले आहेत. त्यामुळे अतिक्रमण व बांधकामावर पावसाळा पूर्वी कारवाई का केली नाही. असा सवाल नागरिकांतून होत आहे.

शहराचे वाढते नागरीकरण, लोकसंख्या वाढ आणि झपाट्याने वाढणारी सिमेंट जंगले यामुळे ड्रेनेज लाईन कालबाह्य झाली आहे. जलनिस्सारण लाईनव्यवस्था देखील जुनी होऊन गळती होत आहे. समाविष्ट आणि नव्याने विकसित होत असलेल्या भागात नैसर्गिक नाले पाईपलाईन टाकून बुजविले गेले आहेत. काही ठिकाणी नाल्यांवरच बांधकामे केली आहेत. त्यामुळे ड्रेनेजलाईन वारंवार तुंबणे, पावसाळ्यात पाण्याचा योग्य निचरा न होणे, लोकवस्तीत पाणी शिरणे आणि रस्त्यावर, भुयारी मार्गात पाणी साचून तळे निर्माण होण्याच्या घटना घडत आहेत.

# पवना धरण 100 टक्के भरले, पाणी सोडण्यास सुरुवात

## मावळातील शेतीची तर पिंपरी-चिंचवड करांच्या पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरण पाणलोट क्षेत्रात मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे धरण शंभर टक्के भरले आहे. यामुळे मावळातील शेतीचा आणि पिंपरी चिंचवडच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वर्षभर मिटला आहे. दरम्यान, धरण कार्यक्षेत्रात पावसाचा जोर वाढला असून धरणातील पाण्याची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे पवना, इंद्रायणी या नद्या दुथडी भरुन वाहत आहेत.



पिंपरी-चिंचवड शहरासह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्त्रोत आहे. पवना नदीत पाणी सोडून महापालिका रावेत येथील बंधाऱ्यातून पाणी उचलते. निगडी, प्राधिकरणातील जल शुध्दीकरण केंद्रात पाण्यावर प्रक्रिया केली जाते. तेथून शहरात वितरीत केले जाते.

सध्या शहराला पवना ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० एमएलडी (दशलक्ष लीटर) पाणी पुरवठा केला जात आहे. शहराला गेल्या पाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे.

पावसाने ओढ दिल्याने जूनमध्ये धरणातील पाणीसाठा १७ टक्क्यांवर आला होता. जून महिना कोरडा गेल्याने पाणी कपातीचे संकट ओढवले होते. साधारणपणे १५ जुलैनंतर आणि ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीला झालेल्या दमदार पावसामुळे धरणातील पाणी पातळी सातत्याने वाढत गेली. आठवडाभर दमदार पाऊस झाला. धरणात २३ जुलैला ५० टक्के पाणीसाठा झाला होता. त्यानंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे तीन वेळा धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण १०० टक्के भरले आहे. पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढलेला आहे. पाणी पातळीत व धरणाच्या येव्यामध्ये होणारी वाढ विचारात घेता धरणातील पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता रविवारी दुपारी चार वाजल्यापासून पवना धरणाच्या सांडव्यावरून ४२६० क्युसेकने क्षमतेने नदी पात्रात विसर्ग करण्यात आला आहे. तसेच सद्यस्थितीत जलविद्युत केंद्रामधून विद्युत गृहाद्वारे १४०० क्युसेक इतक्या क्षमतेने नदीपात्रात विसर्ग सुरू असून एकुण ५६६० क्युसेकने इतक्या क्षमतेने नदीपात्रामध्ये विसर्ग होत आहे.

दरम्यान, पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी व जास्त करण्यात येईल. पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास/ प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### धरणातून विसर्ग सुरू, प्रशासन सतर्क

» पिंपरी-चिंचवड शहर आणि धरण क्षेत्रात पाऊस सुरू झाल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे आदेश दिले असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहावे, असे आवाहनही केले आहे.

# चिखलीतील बेकायदा पार्किंगमुळे रस्ता बनला अपघात केंद्र

## स्पाइन रस्त्यावर अवजड वाहनांमुळे रस्त्याला अडथळा : पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली स्पाईन रस्ता, सिटी प्राइड शाळेच्या बाजूला त्याचप्रमाणे जुन्या आरटीओ कार्यालयालगत मोठ्या प्रमाणात अवजड वाहने व प्रवासी बसची बेकायदा पार्किंग करण्यात येत आहे. परिणामी , या रस्त्याचा वापर करणाऱ्या इतर वाहनांना त्याचा अडथळा होत आहे. परिसरातील सोसायटी आणि स्थानिक नागरिकांनी तक्रार करूनही, यावरती कारवाई होत असल्याने हा रस्ता अपघाताचे केंद्र ठरला आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे.



फिनोलेक्स चौकापासून पुढे जुने आरटीओ कार्यालय तसेच, स्पाइन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहने पार्क केली जातात. छत्रपती संभाजी महाराज रोडवरील आकाशवेध सोसायटीपासून लव्ह-नेस्ट सोसायटीपर्यंतच्या रस्त्यावर दिवसा आणि रात्रीच्या वेळी अनेक बेकायदेशीर ट्रक, वाहने उभी असतात.

याबाबत सोसायटीच्या सदस्यांनी तक्रार केली होती. यामुळे इमारतीतील सदस्यांना तसेच अन्य वाहनांच्या रहदारीस अडथळा येतो. त्याचप्रमाणे रात्रीच्या वेळेस या वाहनांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. येथील बेकायदेशीर वाहनांबद्दल वारंवार तळवडे वाहतूक शाखेस सांगून देखील कोणतीही कारवाई होत नाही.

या रस्त्यावर, शिवरोड तसेच इतर आजूबाजूच्या रोडवरदेखील अशीच वाहने उभे केली जातात. या वाहनामुळे सोसायटीमधील नागरिकांना तसेच महिलांना प्रवास करताना खूप मोठ्या प्रमाणात अडचण होते आणि यामुळे अपघात होण्याची शक्यता देखील आहे. यावर पोलीस आयुक्तांच्या माध्यमातून लवकरात लवकर कारवाई व्हावी अन्यथा, आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे सांगत आहेत.

या रस्त्यावर लागलेल्या बेकायदेशीर वाहनांमुळे अनेक वेळा या ठिकाणी अपघात देखील झालेले आहेत. तसेच या ठिकाणी बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याची शक्यता आहे. तरी याकडे तातडीने लक्ष देऊन आपल्या स्तरावरून आदेश काढून या रोडवर थांबणारी सर्व ट्रक आणि इतर वाहने बाजूला करून संबंधित वाहनमालकांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आहे.

### वाहनांची संख्या वाढली

» या ठिकाणी गेल्या काही दिवसांत वाहने पार्क करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पूर्वी जेमतेम ८-१० वाहने पार्क करण्यात येत होती. मात्र, या ठिकाणी पार्क केल्यावर कारवाई होत नाही, असा समज झाल्याने परिसरामध्ये बेकायदा पार्किंगची संख्या वाढली आहे. विशेष म्हणजे दिवस-रात्र या ठिकाणी वाहनांची ये-जा सुरू असते. त्यामुळे एक वाहन गेल्यानंतर लगेच तेथे दुसरे वाहन लागते.

# पीएमआरडीएच्या पदभरतीचा मार्ग खुला

## एमपीएससीकडून 'अ' आणि 'ब' वर्गातील 400 पदे भरली जाणार : सेवा प्रवेश नियमावलीला मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेलया पीएमआरडीएच्या ४०७ पदभरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या आकृतीबंदला राज्य सरकारने यापूर्वी मंजुरी दिली होती. त्यानंतर आता सेवा प्रवेश नियमावलीला मंजुरी मिळाली आहे. नगरविकास विभागाकडून कार्यवाही झाली आहे. दरम्यान, कंत्राटी कामगारांच्या विरोधात असलेल्या तक्रारी आणि लाचलुचपत विभागाकडून झालेली कारवाई या पार्श्वभूमीवर स्वतंत्र मनुष्यबळ निर्माण करण्याबाबत भर देण्यात आलेला आहे.

पीएमआरडीएची ३१ मार्च २०१५ रोजी स्थापना झालेली आहे. पीएमआरडीए हद्दीत ८१७ गावांचा समावेश आहे. पीएमआरडीएचे क्षेत्र सुमारे ७ हजार २५६ चौरस किलोमीटर इतके आहे. पीएमआरडीएच्या स्थापनेपासून वरिष्ठ पदांवर विविध विभागातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने तात्पुरती नियुक्ती केली जात होती. तर, कारकून, शिपाई ही पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत होती.

गेल्या अनेक वर्षांपासून नॅशनल सिक्युरिटी या एकाच कंपनीचे विविध विभागात कर्मचारी कार्यरत आहेत. या वर्षी या कंपनीचा ठेका बदलण्याबाबत हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यासाठी नवीन प्रस्ताव देखील मागवण्यात आले आहेत. त्यामुळे या कंपनीला सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

राज्य सरकारने पीएमआरडीएच्या आकृतीबंधाला मंजुरी दिली. मात्र, सेवा प्रवेश आणि सेवा वर्गीकरण (विनियम २०२३) अंतर्गत पद भरतीप्रक्रिया नियमावलीला मंजुरी प्रलंबित होती. अनेकदा याबाबत पाठपुरावा देखील केला होता. मात्र, भरती कर्मचाऱ्यांची संख्या आणि नेमके मनुष्यबळ याची सांगड घालता येत नव्हती. त्यामुळे हे प्रकरण रखडले होते. दरम्यान, याबाबत नगरविकास विभागाचे सहसचिव सुबराव शिंदे यांनी शासन निर्णय जारी केला आहे.

त्यामुळे पीएमआरडीएकडून विविध विभागांतील सेवा नियमावली तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती देताना पीएमआरडीएचे सहआयुक्त प्रशासन सुनील पांढरे म्हणाले की, आकृतीबंधानंतर आता सेवा प्रवेश नियमावलीला मंजुरी मिळाल्याने पदभरती होऊ शकणार आहे. या पदभरतीला सुमारे वर्षभराचा कालावधी लागेल. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून 'अ' आणि 'ब' वर्गातील पदे भरली जातील. तर, जिल्हा निवड समित्यांमार्फत 'क' आणि 'ड' वर्गातील पदे भरण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे तत्कालीन नवनगर विकास प्राधिकरणात कार्यरत असलेले आणि विलीनीकरणानंतर पीएमआरडीएच्या सेवेत आलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देता येणार आहे.

### कंत्राटी कामगारांच्या भरमसाठ तक्रारी

» पीएमआरडीएच्या विविध विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आहेत. सर्वाधिक तक्रारी या अतिक्रमण आणि अभियांत्रिकी विभागातील आहे. मात्र यावरती गेल्या अनेक दिवसांपासून थेट अशी कारवाई होत नव्हती. त्यानंतर थेट मुख्यमंत्री कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतर यावर कारवाई करण्यात आली. आता १६ कनिष्ठ अभियंत्यांना कामावरून काढून टाकल्यानंतर इतर तक्रारींकडे मोर्चा वळवला आहे. यासाठी थेट आयपीएस आणि अतिक्रमण विरोधी पथक प्रमुख अमोल तांबे यांची निवड केली आहे. त्यामुळे आणखी काही कर्मचारी रडावर येणार आहेत.

### कंत्राटी मनुष्यबळ होणार कमी

» प्राधिकरणाचा स्वतंत्र आकृतीबंध मान्य केला असून, जवळपास ४०० कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर या दरम्यान कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम संपुष्टात येईल. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या कमी होणार आहे. शिपाई व इतर साहाय्यक या 'ड' वर्गाचे मनुष्यबळ कंत्राटीने भरावे लागणार आहे.

# मंडई परिसरातील वाहनतळाच्या प्रवेशद्वारावर थाटली दुकाने

## महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारी झटकली : दुकाने अधिकृत की अनधिकृत याबाबत माहिती नसल्याची सारवासारव

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मंडई परिसरातील पुणे महापालिकेच्या हुतात्मा बाबू गेनू वाहनतळाच्या प्रवेशद्वारावर विविध प्रकारची दुकाने थाटण्यात आली आहेत. त्यामुळे गाड्या पार्क कशा कराव्या, असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे.

वाहनतळाच्या प्रवेशद्वारावरच दुकाने थाटून अतिक्रमण करण्यात आले आहे. या वाहनतळात मेट्रोच्या कामामुळे ही दुकाने महापालिका प्रशासनाने स्थलांतरित केली असल्याचे सांगितले जात आहे. परंतु याबाबत महापालिकेचा प्रकल्प विभाग, अतिक्रमण विभाग आणि मंडई विभागाच्या अधिकाऱ्यांनी हात वर केले असून जबाबदारी एकमेकांवर झटकण्याचा खेळ त्यांनी चालवला आहे.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे बाजारपेठेत विविध दुकाने वाढू लागली आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानदारांनी वाहनतळाच्या प्रवेशद्वारावरच दुकाने थाटल्याने गर्दी होऊ लागली आहे. शहरातील मुख्य रस्त्यांना अतिक्रमणाचा विळखा पडलेला आहे. हे कमी की काय म्हणून आता वाहनतळावरदेखील अतिक्रमण झाल्याने वाहनचालकांनी डोक्याला हात लावला आहे.



हुतात्मा बाबू गेनू वाहनतळाच्या पार्किंगच्या प्रवेशद्वारावरच दुकाने थाटण्यात आल्याचे समोर आले आहे. या पार्किंगची जबाबदारी असलेल्या प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता, मंडईतील मेट्रो स्थानकाच्या कामामुळे बाधित झालेल्या काही स्टॉलधारकांना स्थानकांच्या तळघरात स्थलांतरित करण्यात आल्याचे सांगितले. दरम्यान, या संदर्भात ठोस माहिती देण्यास त्यांनी नकार दिला. येथील किती दुकानदारांचे स्थलांतर झाले, याची माहिती अतिक्रमण विभागाकडे आहे. संबंधित काम मंडई विभागाचे असल्याचे अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. त्याचवेळी मंडई विभागाच्या अधिकाऱ्याकडून याबाबत कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही. अशा स्थितीत ही दुकाने संबंधित ठेकेदाराने अनधिकृतपणे उभारली आहेत का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

मेट्रोच्या कामामुळे काही दुकाने स्थलांतरित झाली असली तरी रस्त्यांच्या दुतर्फा अजूनही दुकाने आहेत. आगामी गणेशोत्सवामुळे बाजारपेठेत रहदारी वाढली आहे. नागरिकांना वाहने लावण्यासाठी जागा मिळत नाही. त्याचबरोबर वाहनतळाच्या प्रवेशद्वारासमोरच दुकाने थाटण्यात आली आहेत. परंतु, त्यासाठी महापालिका प्रशासनाची परवानगी आहे की नाही, याची माहिती मिळू शकली नाही.

दरम्यान शहरातील अतिक्रमण वाढल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत नागरिकांनी पुण्याचे खासदार असलेले केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे तक्रार केली होती. मोहोळ यांनी महापालिका प्रशासनाला शहरात अतिक्रमण मुक्त करण्याचे निर्देश दिले होते. तसेच कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर महापालिकेने मोठा गाजावाजा करत १५ दिवसांचे नियोजन करून अतिक्रमण कारवाई सुरू केली होती. परंतु ती कारवाई थंडावली असून अधिकारी कार्यालयात एसीची हवा खात बसले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

याच बाबू गेनू वाहनतळावर वाहनतळावर पार्किंगसाठी जादा पैसे आकारत असल्याच्या अनेक तक्रारी महापालिकेला प्राप्त झालेल्या आहेत. मात्र, महापालिकेला ठोस पुराव्यांच्या अभावी कारवाई करणे शक्य होत नसल्याचे अधिकारीच सांगत आहेत. त्यामुळे वाहनतळाच्या ठेकेदाराचा मनमानी कराभार सुरू असून महापालिकेच्या नियमाला फाट्यावर मारले जात आहे.